दिनांक 02/08/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.24

विषय – नगरपरिषद हद्दीतील विशेष रस्ता अनुदानातून विविध विकास कामांना मंजूरी देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ:- 1)शासननिर्णय क्र. रस्ताअ -2021/प्र.क्र.219(13)/नवि.-16 मंत्रालय,मुंबई दिनांक 03/11/2021

2) विटा नगरपरिषदेकडील मा.विशेष सभा ठराव क्रमांक 97 दि.21/12/2021

3)मा.जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडील क्र.नवि/कार्या-2/कावि-22/एसआर- 12/2022 दि.28/01/2022

4)शासन शुध्दीपत्रक क्रमांक - रस्ताअ-2021/प्र.क्रं.219(13)/नवि.-16 मंत्रालय,मुंबई दिनांक 05/05/2022

5)नगरपरिषदेने मा. जिल्हाधिकारीसो यांचेकडे प्रशासकीय मंजुरीसाठी केलेला दि- 01/07/2022 रोजीचा प्रस्ताव

बांधकाम विभागाकडील अहवालानुसार संदर्भ क्र. 1 अन्वये विटा नगरपरिषद हद्दीतील विशेष रस्ता अनुदान योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून 26 कामांसाठी 500.00 लक्ष अनुदान मंजूर करणेत आलेले आहे. संदर्भ क्र. 2 नुसार सदर कामांना विशेष सभेची मंजूरी घेतलेली आहे. संदर्भ क्र. 3 नुसार विटा नगरपरिषद हद्दीतील विशेष रस्ता अनुदान योजने अंतर्गत मा.जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडून 23 कामांना रक्कम रुपये 4,26,88,345/- इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. उर्वरित कामे ही यापूर्वी इतर योजनेतून घेणेत आलेली आहेत.सदरहू कामे करणेसाठी ही शासनाच्या संदर्भ क्र. 4 नुसार शिल्लक निधीतून 6 कामांना रक्कम रुपये 75,41,111/- निधी मंजूर करण्यात आला

आहे. तरी सदर कामांना मंजूरी घेणे आवश्यक आहे. शासन निर्णयामध्ये नमूद केलेली कामे खालीलप्रमाणे.

| अ.नं. | प्रस्तावित कामांची नावे | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | तांत्रिक मान्यता |
|---|---|---|---|
| 1. | 1)विटा न.पा.हद्दीतील क्रिडा संकुल राजकुमार माने ते सुखदा अपार्टमेंट जवळ रस्ता डांबरीकरण करणे. | 9,60,198 /- | म.जी.प्रा.सांगली जा. क्र. तां.शा.1/तां.मा./विटा न .प.1110/2022 दि.20/06/2022 |
| | 2)नगरपरिषद हद्दीतील लेंगरे रोड येथे रवी निकम घर ते बबनराव कदम घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 4,96,868 /- | नगरअभियंता,विटा नगरपरिषद विटा. 203/ दि.15/06/2022 |
| 2. | विटा न.पा.हद्दीतील शिवमल्हारनगर येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | 14,40,235 /- | म.जी.प्रा.सांगली जा. क्र. तां.शा.1/तां.मा./विटा न .प.1110/2022 दि.20/06/2022 |
| 3. | विटा न.पा.हद्दीतील साळशिंगे रोड येथे अतुल जगन्नाथ तारळेकर घर ते साळशिंगे रोड रस्ता डांबरीकरण करणे व आर.सी.सी. गटर करणे. | 17,84,752 /- | म.जी.प्रा.सांगली जा. क्र. तां.शा.1/तां.मा./विटा न .प.1110/2022 दि.20/06/2022 |
| 4. | विटा न.पा.हद्दीतील महावीरनगर येथे सुधाकर शेठ शहा सांस्कृतीक भवन परिसर लादीकरण व इतर कामे करणे. | 10,85,805 /- | म.जी.प्रा.सांगली जा. क्र. तां.शा.1/तां.मा./विटा न .प.1110/2022 दि.20/06/2022 |
| 5. | विटा न.पा.हद्दीतील भवानीमाळ येथे रेवननाथ प्लाझा ते अर्जुन पाटील | 17,55,706 /- | म.जी.प्रा.सांगली जा. क्र. तां.शा.1/तां.मा./विटा न |

| | | | |
|---|---|---|---|
| | (बाजीराव पाटील) घर व भवानीमाळ रोड ते रोहित पाटील रस्ता डांबरीकरण व आर.सी.सी. गटर करणे. | | .प.1110/2022 दि.20/06/2022 |
| | **एकुण** | 75,23,564 /- | |

वरील कामांना तांत्रिक मंजूरी प्राप्त झालेली असुन प्रशासकीय मान्यतेसाठी मा. जिल्हाधिकारीसो यांचेकडे सादर करणेसाठी सदर कामांना कार्यालयीन टिपणी दिनांक 27/07/2022 नुसार मंजूरी देत आहे. या याकामी पुढील आवयश्क ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 02/08/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 25

विषय – नगरपरिषद हद्दीतील वैशिष्टयपूर्ण कामासाठी विशेष अनुदानातून विविध विकास कामांचे प्रमाणपत्र देणेबाबत सार्वजनिक बांधकाम उपविभाग, विटा यांचेकडील दि.15/07/2022 रोजीचे पत्रावर निर्णय घेणे.

संदर्भ:-1) नगरविकास विभाग शासन निर्णय क्रंमांक – नपावै-2022/प्र.क्रं.138अ(38)/नवि.-16 मंत्रालय,मुंबई दिनांक 15/06/2022 चे पत्र.

2) मा.उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,विटा जि.सांगली यांचेकडील जा.कं. 949/2022 दिनांक 15/07/2022 चे पत्र.

बांधकाम विभागाकडील अहवालानुसार, संदर्भ क्र.1 नुसार विटा नगरपरिषद हद्दीतील वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून 04 कामांसाठी 200.00 लक्ष अनुदान मंजूर करणेत आलेले आहे. सदर कामे करणेसाठी शासन सार्वजनिक बांधकाम विभाग ही कार्यान्वयीन यंत्रणा आहे. संदर्भ क्र. 2 नुसार मा.उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, विटा जि.सांगली यांनी प्रमाणपत्र मागणी करणेत आलेली आहे. सदरची कामे खालीलप्रमाणे.

| अ.नं | प्रस्तावित कामांची नावे | शेरा |
|---|---|---|
| 1 | विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.5 नेहरुनगर येथे खंडोबा मंदिर व मरिमी मंदिरासमोर सभागृह बांधणे. | याबाबत जा.क्र.1556 दि.20/07/2022 अन्वये त्रृटीपत्र दिलेले आहे. |
| 2 | विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 11 मधील जैन मंदिर ते कराड रोड पर्यंत रस्तार व गटर करणे. | यापूर्वी जा.क्र.1337 दि.05/07/2022 अन्वये |

| | | |
|---|---|---|
| | | प्रमाणपत्र दिलेले आहे. |
| 3 | विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 8 नेवरी रोड ते कराड रोड (बादशाह भई गॅरेज मार्ग ) रस्ता करणे. | यापूर्वी जा.क्र.3230 दि.25/03/2021 अन्वये प्रमाणपत्र दिलेले आहे. दिलेले आहे. |
| 4 | विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 5 कदमवाडा ते घुमटमाळ लेंढुरीचा ओढयावर पूल बांधणे. | |

तसेच काम क्र.1 च्या प्रस्तावामध्ये त्रृटी असलेने नगररचना विभागाकडून कळविणेत आलेले आहे. सदर त्रृटीची पुर्तता झालेनंतर काम क्र.1 च्या प्रस्तावाबाबत पुढील नियमोचीत कार्यवाही करणेत येईल. यातील काम क्र.1 वगळून झालेली कामे व चालु कामे व खाजगी जागेतील कामे वगळून उर्वरीत कामांना कार्यालयीन टिपणी दिनांक 27/07/2022 नुसार मंजूरी देत आहे. या याकामी पुढील आवयश्क ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 02/08/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.26

विषय - नगपरिषदेकडील अर्किटेक्ट नेमणूकीबाबत श्री.विठ्ठल पाचकवडे व श्री.चंद्रकांत पाटील यांचे दिनांक 27/04/2022 रोजीचे दाखल अर्जावर मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेणे.

बांधकाम विभागाकडील अहवालानुसार नगपरिषदेकडील अर्किटेक्ट नेमणूकीबाबत श्री.विठ्ठल पाचकवडे व श्री.चंद्रकांत पाटील यांचे दिनांक 27/04/2022 रोजीचे दाखल अर्जाने मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. सदर निविदाधारक हे सन 2021-2022 चे दराप्रमाणे सन 2022-2023 या वित्तीय वर्षासाठी काम करणेस तयार असलेबाबत कळविले आहे तरी त्यांना सन 2022-2023 या वित्तीय वर्षासाठी नगपरिषदेचे अर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेस मंजूरी देत आहे.तसेच इतर आर्किटेक्ट इच्छुक असतील तर शासन दराप्रमाणे सन 2022-23 साठी नेमणूक करणेस मंजूरी देत आहे. सदर आर्किटेक्ट नेमणूकीबाबत कार्यालयीन टिपणी दिनांक 13/06/2022 नुसार मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवयश्क ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा